महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
मादाम माका मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुख्य इमारत, १ ला मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
**ईमेल- doj1.rfd@maharashtra.gov.in**

---

**क्रमांक : जमीन-२०२४/प्र.क्र.३१/ज-१** **दिनांक :- १२ मार्च, २०२४**

**प्रति,**

**जिल्हाधिकारी (सर्व)**

**विषय:- भोगवटादार वर्ग-२ चा धारणाधिकार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणेबाबत शासन अधिसूचनेतील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादेत कारवाई करणेबाबत...**

**संदर्भ:-** १) शासन अधिसूचना क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.९०/ज-१,दि. ०८/०३/२०१९
२) शासन अधिसूचना क्र. जमीन-२०२२/प्र.क्र.१७०/ज-१,दि.२७/०३/२०२३
३) शासनाचे समक्रमांकाचे दि. २१.०२.२०२४ रोजीचे पत्र.
४) शासनाचे समक्रमांकाचे दि. ०१.०३.२०२४ रोजीचे पत्र.

"महाराष्ट्र जमीन महसूल (भोगवटादार वर्ग-२ आणि भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम, २०१९" हे संदर्भ क्र. १ व २ अधिसूचने अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. तसेच, संदर्भ क्र-२ येथे नमूद दि. २७ मार्च,२०२३ च्या अधिसूचने अन्वये सवलतीच्या दराने भोगवटादार वर्ग-२ च्या जमिनीचे रुपांतर भोगवटादार वर्ग-१ मध्ये करण्याबाबतचा कालावधी हा दि. ०७ मार्च, २०२४ रोजी संपुष्टात येत आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदरहू पत्रातील सूचनांबाबत पुढीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

*"ज्या व्यक्ती/संस्था यांनी जमिनीचा धारणधिकार वर्ग-१ मध्ये करण्याबाबत दि ०७ मार्च, २०२४ पूर्वी अर्ज केला असेल अशा सर्व प्रकरणांच्या पात्र / अपात्र बाबतची छाननी विषयक प्रक्रिया पूर्ण करून सर्व संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी प्राप्त प्रकरणांचा निपटारा करून संबंधित व्यक्ती/संस्थेस अधिमूल्यांची रक्कम भरण्याबाबते पत्र देण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दि.०७ जून, २०२४ पर्यंत करणे आवश्यक राहील. तद्नंतर, अधिमूल्यांची रक्कम भरण्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचेकडून निर्गमित झालेल्या पत्राच्या अनुषंगाने संबंधित अर्जदार व्यक्ती/संस्थेस अधिमूल्यांची रक्कम भरण्यासाठी २१ दिवसांची, म्हणजेच दि. २८ जून, २०२४ पर्यंत मुदत देण्यात यावी."*

*०२. संदर्भ क्र.३ च्या पत्रातील मुद्दा क्र.३ व ४ वगळण्यात येत असून अधिमूल्याची रक्कम भरण्यासाठी पत्र दिलेल्या सर्व अर्जदारांना रक्कम भरण्यासाठी अंतिम मुदत दि.२८ जून, २०२४ ही राहील. तसेच, संदर्भ क्र.३ च्या* पत्रातील इतर कोणत्याही मार्गदर्शन सूचनेत बदल झालेला नाही.

उपरोक्त बाब सर्व हितसंबंधितांच्या निदर्शनास आणावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(विनायक लवटे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

c:\users\vikram.nikam\downloads\जमीन २०२४ प्र.क्र. ३१ ज-१ए वर्ग-२ चे वर्ग-१ रुपांतरण ltr.docx३

प्रत,

१) ज- समूहातील सर्व सह सचिव / उप सचिव

२) विभागीय आयुक्त (सर्व)

३) निवड नस्ती ज-१